# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in    Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक:२/एनजीसी/न.प्र.त/२०१७/४९

दिनांक : १२ जानेवारी, २०१७

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,

अमरावती व नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या मान्यता प्रक्रीयेबाबत........

संदर्भ :-१) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेली जाहिरात क्रमांक ॲप्रुव्हल/१२/(११)/२०१६

२) या संचालनालयाने प्रसिध्द केलेली अधिसूचना क्रमांक २(३)/एनजीसी/ मान्यता/२०१७/४८, दि. ११/०१/२०१७

३) या संचालनालयाने वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली अधिसूचना क्रमांक २(३)/ /एनजीसी/ मान्यता/२०१६/४७ , दि. ११/०१/२०१७

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या मान्यता प्रक्रीयेबाबतचे अर्ज ऑन लाईन पध्दतीने दि. ०४.०२.२०१७ पर्यंत व विद्यमान संस्थाच्या मान्यतेस विस्ताराबाबतचे अर्ज दि. ९.०२.२०१७ पर्यंत सादर करण्यासाठी संदर्भ क्रमांक १ अन्वये जाहिरात प्रसिध्द केलेली आहे. सदर जाहीराती अन्वये परिषदेच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०१७-१८ मधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (टेक्निकल इन्स्टिट्यूशनकरिता मान्यतेला मंजूरी) नियम, २०१६ चे विनियम नुसार ऑन लाईन पध्दतीने अर्ज करण्यास सूचित केले आहे. सदर जाहिरातीस अनुसरून संदर्भ क्रमांक २ व ३ अन्वये राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यमान संस्थानी परिषदेस सादर केलेल्या अर्जावर शासनाचे अभिप्राय परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने संचालनालयाच्या http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. १६ जानेवारी, २०१७ पासून लिंक उपलब्ध करुन देण्यात येणार असून संबंधितांना दि. ०५.०२.२०१७ पर्यंत माहिती भरण्यास सूचित केले आहे. नवीन तांत्रिक संस्था / महाविद्यालये सुरू करणे, विद्यमान संस्थेची साईट / ठिकाणातील बदल, संस्था बंद करणे, पदविका स्तरावरुन पदवी स्तरावर परिवर्तन व त्याउलट आणि मागील शैक्षणिक वर्षातील खंडतेनंतर मान्यता सुरू ठेवणे इ .साठी ज्या संस्थानी परिषदेस अर्ज केले असतील त्यांना आपल्याकडे संपर्कासाठी सूचित केले आहे. आपल्या कार्यालयास प्राप्त होणारे प्रस्तावांबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेस अनुसरून संदर्भ क्रमांक २ व ३ च्या अधिसूचनेतील निर्देश आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील सर्व संस्थांना आपले स्तरावरुन देण्यात यावेत.

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या जाहिरातीस अनुसरून विना अनुदान तत्वावर पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था / महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१३/प्र.क्र.४३/तांशि ४, दि. २१.०८.२०१३, तसेच शासन शुध्दीपत्रक दि. १४ मार्च, २०१६ अन्वये नोंदणी शुल्क निर्धारीत करण्यात आले आहे. त्यानुसार आपल्याकडे प्राप्त होणा-या प्रस्तावांच्या अनुषंगाने नोंदणी शुल्क जमा करण्यात यावे. ज्या संस्था नोंदणी / तपासणी शुल्क भरणार नाहीत, अशा संस्थाच्या प्रस्तावावर शासनाचे अभिप्राय अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद / वास्तूकला परिषदेकडे पाठविण्यात येणार नाही व त्यास संबंधित संस्था / ट्रस्ट सर्वस्वी जबाबदार राहील याची आपल्या स्तरावरुन संबंधितांना जाणीव करुन देण्यात यावी.

३. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून <u>नवीन तांत्रिक संस्था / महाविद्यालये सुरू करणे, विद्यमान संस्थेची साईट / ठिकाणातील बदल, संस्था बंद करणे, पदविका स्तरावरुन पदवी स्तरावर परिवर्तन व त्याउलट इ साठी</u> ज्या संस्थांनी परिषदेस अर्ज / प्रस्ताव सादर केले असतील अशा संस्थांनी दिनांक ०५/०२/२०१७ पर्यंत प्रस्तावाच्या प्रतीसह आपल्या कार्यालयास संपर्कासाठी सूचित केले आहे. याबाबत प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने दि.२१.०८.२०१३ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित संस्थेने नोंदणी शुल्क/तपासणी शुल्क भरल्यानंतरच आपल्या स्तरावर त्रिसदस्यीय तपासणी समिती नेमण्यात यावी. सदर समितीमध्ये **स्थापत्य अभियांत्रिकी किंवा उपयोजित यंत्रशास्त्र व आर्किटेक्चर विभागातील विभाग प्रमुख/प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक अशा एका सदस्याचा समावेश करण्यात यावा** व सदर समितीने शिखर परिषदांच्या मानकाप्रमाणे जमीनीचे सर्व संबंधित कागदपत्रे, उदा. ७/१२ चा उतारा, सर्वे नं., बिगरशेती प्रमाणपत्र, लँड युज सर्टिफिकेट, ऑक्युपेन्सी सर्टिफिकेट, बांधकाम प्रमाणपत्र, कौन्सील ऑफ आर्किटेक्चरचे रजिस्टर्ड आर्किटेक्ट यांनी प्रमाणीत केलेले नकाशे, बांधकामाचे मोजमाप इत्यादी सर्व कागदपत्रांची पडताळणी संबंधित मूळ कागदपत्रावरुन प्रत्यक्ष करण्यात यावी. त्यानुसार संबंधित जागा, इमारत, बांधकाम, निधी, यंत्रसामुग्री व इतर सोयी-सुविधा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीताच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक / वास्तुकला परिषदेने निर्धारीत केलेल्या विहित केलेल्या मानकानुसार सदर सोयी-सुविधा उपलब्ध असल्याबाबत तपासणी करण्यात यावी.

४. मुद्या क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या प्रस्तावांपैकी <u>नवीन तांत्रिक संस्था / महाविद्यालये सुरू करणे यासाठीचा</u> तपासणी समितीचा अहवाल सोबतच्या Annexure "A" व "B" मध्ये, तसेच <u>पदविका स्तरावरुन पदवी स्तरावर परिवर्तन व त्याउलट यासाठीचा तपासणी समितीचा अहवाल</u> सोबतच्या Annexure "C" व "D" मध्ये संबंधित संस्थेच्या प्रस्तावाच्या प्रतीसह अभ्यासक्रमनिहाय दोन प्रतीत दि. १०.०२.२०१७ पर्यंत आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह (Remommended / Not -

Recommended ) उपलब्ध करुन द्यावा. तसेच सदर अहवालाची सॉफ्ट कॉपी (इंग्रजी टाईम्स न्यु रोमन फॉन्टमध्ये) ई-मेल व्दारे [desk2@dtemaharashtra.gov.in ] सुध्दा उपलब्ध करुन द्यावी. त्याचप्रमाणे विद्यमान संस्थेची साईट / ठिकाणातील बदल व संस्था बंद करणे या प्रस्तावांच्या अनुषंगाने प्रत्यक्ष तपासणी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने निर्धारीत केलेल्या याबाबतच्या नियम तथा तरतूदीनुसार करुन त्यानुसार तपासणी अहवाल दि. १०.०२.२०१६ पर्यंत उपलब्ध करुन द्यावा.

५. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, वास्तुकला परिषद, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील संस्थांना आपल्याकडे जमा करण्यास सूचित केले आहे. त्यानुसार आपल्या कार्यालयात प्राप्त प्रस्तावांना पोच देऊन सदर प्रस्ताव आपल्या स्तरावर जतन करण्यात यावेत.

६. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी मागील शैक्षणिक वर्षातील खंडतेनंतर मान्यता सुरू ठेवण्याबाबत स्वतंत्र अर्ज मागितले आहेत. आपल्या विभागाच्या कार्यकक्षेत्रातील संस्थाचे अशा प्रकारचे अर्ज आपलेकडे प्राप्त झाल्यास अशा संस्थांची अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानके व प्रमाणकांनुसार त्रिसदस्यीय समितीमार्फत तपासणी करून तपासणी अहवाल दि. १०.०२.२०१७ पर्यंत उपलब्ध करुन द्यावा.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / वास्तुकला परिषदने निर्धारीत केलेल्या संबंधित प्रस्तावांबाबतचे शासनाचे अभिप्राय शिखर परिषदांकडे पाठविण्याबाबतचा कालावधी अल्प असल्यामुळे प्राप्त होणा-या सर्व प्रस्तावांची शिफारस शासनाकडे विहित मुदतीत सादर करणे आवश्यक असल्याने याबाबत प्रथम प्राधान्याने कार्यवाही करण्यात यावी. सदर काम विहित मुदतीत पार पाडण्याच्या दृष्टीने आपल्या विभागातील शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेतील शिक्षकीय वर्गाच्या सेवा उपलब्ध करुन घ्याव्यात व त्यासाठी संबंधित संस्थाप्रमुखांना आपल्या स्तरावर सबंधितांच्या सेवा आवश्यकतेप्रमाणे प्रथम प्राधान्याने उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश देण्यात यावेत. नवीन तांत्रिक संस्था / महाविद्यालये सुरु करणे, विद्यमान संस्थेची साईट / ठिकाणातील बदल, संस्था बंद करणे, पदविका स्तरावरुन पदवी स्तरावर परिवर्तन व त्याउलट आणि मागील शैक्षणिक वर्षातील खंडतेनंतर मान्यता सुरू ठेवणे याबाबतच्या प्रस्तावांचे तपासणी अहवाल दि१०.०२.२०१७ पर्यंत किंवा अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेमार्फत वेळोवेळी अद्ययावत करण्यात येणा-या अंतिम दिनांकापर्यंत या कार्यालयास सादर करावेत अन्यथा याबाबतची जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील यांची नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2017/ 121
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक:- 13 JAN 2017

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम,
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, शै.वर्ष 2017-16 पासून **नवीन तांत्रिक संस्था/महाविद्यालये सुरू करणे, विद्यमान संस्थेची साईट/ठिकाणातील बदल, संस्था बंद करणे, पदवीका स्तरावरून पदवी स्तरावर परिवर्तन व त्याउलट आणि मागील शैक्षणिक वर्षातील खंडतेनंतर मान्यता सुरू ठेवणे इ.** साठी ज्या संस्थांनी परीषदेस अर्ज/प्रस्ताव सादर केलेले आहेत **त्यांनी** दि. 05/02/2017 **पर्यंत** या कार्यालयात प्रस्तावाच्या प्रतीसह दि. 21/08/2013 च्या शासन निर्णयामध्ये नमुद केल्याप्रमाणे नोंदणी शुल्क/तपासणी शुल्क भरण्याबाबतची कार्यवाही करावी.

(गुलबिराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय.